जिल्हा रुग्णालय, पुणे अधिनस्थ व पुणे जिल्हयातील महिला /उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयात स्व्च्छता सेवा, वस्त्रधुलाई, आहार सेवा व चाहन चालक सेवा याकरिता ई निविदा प्रक्रियेस व खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१७/ प्रक्र-३१३/आरोग्य ३(अ)
१० वा मजला, संकुल इमारत
जी.टी.रुग्णालय आवार, एल.टी.मार्ग,मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ३१ मार्च,२०१८.

<u>वाचा :-</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांक- ससंआसे / कक्ष -३/ टे-५ /कं.सु/धु/आ/वा.चा.से,जिशचि,औंध, पुणे/१२९९८-९०/१७, दिनांक- १८.०८.२०१७.**

शासन निर्णय:-

जिल्हा शल्य चिकित्सक पुणे या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या महिला / उप जिल्हा / ग्रामिण रूग्णालये या आरोग्य संस्थांमध्ये कंत्राटी स्वच्छता सेवा, वस्त्र धुलाई सेवा, आहार सेवा, आणि वाहन चालक सेवा पुरविणे या चार सेवाच्या खर्चा करीता खालील तपशिला प्रमाणे

क्र.	आरोग्य संस्था	आहार सेवा (वार्षिक) अंदाजित खर्च अ	सफाईगार कर्मचारी वेतन (वार्षिक) अंदाजित खर्च ब	वस्त्रधुलाई सेवा (वार्षिक) अंदाजित खर्च क	वाहन चालक सेवा (वार्षिक) अंदाजित खर्च ड
१	महिला रुग्णालयउपजिल्हा ,बारामती , मंचर ,बारामती उपजिल्हा रुग्णालय ,रुग्णालय	२५,९२,०००	६२,७७,९२०	८,६४,०००	५,२३,८००
२	उपजिल्हा रुग्णालये, इंदापूर उपजिल्हा रुग्णालये दौंड, उपजिल्हा रुग्णालय,भोर	१४,०४,०००	२२,९६,८००	८,२५,६००	३,४९,२००
३	ग्रामीण रुग्णालय, जुन्नर / खेड/ घोडेगाव /वडगावमावळ /काळेकॉलनी, जि पूणे (आदिवासी व बाहय आदिवासी क्षेत्रातील) (एकूण आहारसेवेसाठी ५,ग्रारु जिल्ह स्वच्छता कंत्राटी सेवेसाठी १९ग्रा रु	१५,१२,०००	७०,४३,५२०	४,०३,२००	२४,४४,४००
४	ग्रामीण रुग्णालय,पूणे जिल्हा एकूण ग्रामीण रुग्णालये १९ वस्त्रधुलाई व कंत्राटी वाहनचालक १४ ग्रा रु)	---	----	१४,११,२००	१,७४,६००
एकुण		५५,०८,०००	१,५६,१८,२४०	३५,०४,०००	३४,९२,०००
	एकुण (अ+ब+क+ड) रुपये २,८१,२२,२४०/-				

एकुण रुपये २,८१,२२,२४०/- (अक्षरी दोन कोटी एक्याऐंशी लक्ष बावीस हजार दोनशे चाळीस फक्त) इतक्या रकमेच्या ई-निविदा प्रक्रीया राबविण्यास खालील अटी व शर्तीचा अवलंब करण्यात यावा.

२) अटी व शर्ती:-

१. सदर खरेदी साठी शासन निर्णय, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र-८२/भाग III/उदयोग -४, दिनांक ०१.१२.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारीत नियमपुस्तिकेत विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

२. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विर्निदेश (Technical Specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/ अधिकारी) मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विर्निदेश कोणत्याही पुरवठादारास फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच त्याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३. प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रकियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजारभावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे त्या दरापेक्षा जास्त नसलयाबाबत खातरजमा करण्यात यावी.

४. खरेदी करण्यात येणा-या बाबींची पुरवठा झाल्यानंतर नमुना तपासणी (Pre/post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विर्निदेश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात यावी.

५. खरेदी करण्यात येणा-या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (Storage and Distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) व वस्तुसुची व्यवस्थापन (inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल याची दक्षता घेण्यात यावी .

६. सदर खरेदीची व्दिरुक्ती (Duplication) होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७. मार्गदर्शक सूचनांचे संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

८. खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतर पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

९. सदर खरेदी ३.०० लक्ष पेक्षा जास्त असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करण्यात यावी.

३) सदर प्रस्तावातील आहार सेवा / सफाईगार कर्मचारी निविदा / वस्त्र धुलाई सेवा / वाहन चालक सेवा पुरविणे या बाबीवरील खर्च खालील तक्यात दर्शविण्यात आलेल्या लेखाशीर्षामधुन भागविण्यात यावा. तसेच येणारा खर्च नमुद रकमेच्या मर्यादित राहील याची दक्षता घ्यावी.

लेखाशीर्ष
मागणी क्रमांक आर-१ २२१० -वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य ०१- नागरी आरोग्य सेवा -विषम चिकीत्सा ११० -रुग्णालये व दवाखाने ११०-७- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०६) (०१)- मुफसल क्षेत्रातील अध्यापन्नेतर शासकीय दवाखाने (२२१० ०२२६)
मागणी क्रमांक आर-१ २२१० -वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य ०१- संचालन व प्रशासन (१)(९) महाराष्ट्र आरोग्य विकास प्रकल्पांतर्गत ग्रामीण / कुटीर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन (२२१० ४६२४)
मागणी क्रमांक आर-१ २२१० -वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य (६)-सार्वजनिक आरोग्य ००१-संचालन व प्रशासन (१((८) प्रा.आ.केंद्राचा ग्रामीण रुग्णालय इतका दर्जा वाढविणे (२२१० ०४१३)

लेखाशीर्ष
<u>मागणी क्रमांक आर-१</u> २२१० -वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य ०१- नागरी आरोग्य सेवा -विषम चिकीत्सा ११० -रुग्णालये व दवाखाने (०१) (०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापन्नेतर शासकीय दवाखाने (२२१० ०१४६)

सदर शासन निर्णय शासन निर्णय, वित्त विभाग क्र वि अ प्र- २०१३/प्र. क्रं. ३०/२०१३/ विनियम,भाग-२ दि. १७/४/२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उप विभाग-दोन मधील अ. क्रं.६ नियम क्रं.४० अन्वये प्रशासकीय विभागांस प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३१११०२३७३९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.31 13:07:41 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल-१/२, महाराष्ट्र, लेखा परिक्षा, लेखा व अनुज्ञेयता, मुंबई / नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा , मुंबई
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय-राज्यस्तर), मुंबई
५. उपसंचालकय आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे
६. जिल्हा शल्य चिकीत्सक, पुणे
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८. वित विभाग (कोषागारे / प्रशासन-५), मंत्रालय, मुंबई
९. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती (आरोग्य ३अ)